# ग्रामिण रुग्णालय कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.

## विभाग - प्रशासकिय विभाग

दुरध्वनी ०२३६२२२१७८१

Email –ms_rhkudal@yahoo.co.in


क्र/ग्रारुकु/कं.सेवा/स्वच्छता सेवा/387/२०२६ दिनांक -२८/०३/२०२६

**जाहिर सूचना स्वच्छता सेवा**

ग्रामिण रुग्णालय कुडाळ येथील रुग्णालयीन विभागातील व रुग्णालयीन परीसर दैनंदिन साफसफाई करणेकरीता कंत्राटी पध्दतीने स्वच्छता सेवा पुरविणेची आहे.ईच्छुक पुरवठाधारकांनी सदर स्वच्छता सेवेकरीता सिलबंद लखोटयामधुन दरपत्रक त्यांचे व्यवसायाचे पत्रावर सही करुन दिलेल्या तारखेस व वेळेत खालील विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार सादर करावे.

स्वच्छता सेवेसाठी किमान मासिक वेतन रक्कम हे सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय क्रमांक प्रशामा-१२२२/प्र.क्र.१/आरोग्य-७ दि.१८.०९.२०२३ च्या अधिन राहील.

| | | |
|---|---|---|
| १ | **कामाचे नाव** | ग्रामिण रुग्णालय, कुडाळ जि.सिंधुदुर्ग मुख्य इमारत व परीसरातील स्वच्छता करणे |
| २ | **दरपत्रक भरणेसाठी पात्रता** | २)सुशिक्षीत बेरोजगारांची कार्यरत सेवा सोसायटी संस्था/तत्सम प्रकारची नोंदणीकृत संस्था.<br>०२)कार्यरत मजुर सहकारी संस्था.<br>०३) महिला स्वयंसेवी बचत गट.<br>०४)शासकिय निमशासकिय कार्यालयास आऊटसोर्सिंग व्दारा स्वच्छता सेवा पुरविलेले अनुभवी कंत्राटदार.<br>०५)पॅन कार्ड,जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र,उद्योग आधार नोंदणी प्रमाणपत्र. |
| ३ | **कामाचा कालावधी व अंदाजे रक्कम** | ४ महिने किंवा राज्यस्तरावरुन ई निविदा कार्यवाही होईपर्यंत.अंदाजित मनुष्यबळावरील खर्च किमान वेतना नुसार १५०१० x ४ + साहीत्यावरील खर्च रु.५००० दरमहा एकुण ६५,०४०/- सर्व करांसहीत |
| ४ | **दरपत्रकासोबत आवश्यक कागदपत्रे** | ६) बेरोजगार व मजुर संस्था असलेस संस्था नोंदणी अधिनियमाप्रमाणे नोंदणी प्रमाणपत्र.<br>७) बचत गटाचे बाबतीत ज्या तालुक्यामध्ये गट येतो त्या तालुक्याचे गटविकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र.<br>८) सर्वांसाठी पॅनकार्ड आवश्यक (संस्थेचे नावे किंवा संस्थेचे विद्यमान अध्यक्ष)<br>९) राष्ट्रीयकृत अथवा शेडयुल बॅकेमध्ये खाते<br>१०) जीएसटी नोदणी प्रमाणपत्र |

| | | |
|---|---|---|
| ५ | **दरपत्रक सादर करणेचे ठिकाण व दरपत्रक उघडपेचे ठिकाण** | वैद्यकिय अधिक्षक ग्रामिण रुग्णालय,कुडाळ जि.सिंधुदुर्ग यांचे कार्यालय |
| ६ | **दर पत्रक सादर करणेची अंतिम दिनांक व वेळ** | दिनांक ३१/०३/२०२६ सायंकाळी १६.०० |
| ७ | **दरपत्रक उघडणेचा अंतिम दिनांक** | दिनांक ०१/०४/२०२६ दुपारी ११.००<br>दरपत्रक सादर करणारी व्यक्ती,संस्था यांनी सदर वेळी उपस्थित राहावे.ते उपस्थित न राहील्यास २ सदस्यीय समितीसमोर उघडणेत येतील. |
| ८ | **दरपत्रकाचे अधिकार** | वैद्यकिय अधिक्षक ग्रा.रु.कुडाळ |

**कामाचे नाव -ग्रामिण रुग्णालय कुडाळ जि..सिंधुदुर्ग येथिल रुग्णालयीन ईमारत व परिसर यांची स्वच्छता करणे**

कामाची माहिती

| | | |
|---|---|---|
| १ | मोकळे क्षेत्र | ग्रामिण रुग्णालय,मुख्य इमारती व परीसरातील सर्व रस्ते,इमारतीजवळील पेव्हर ब्लॉक बसविलेल्या जागा वाहनतळ,दोन इमारतीमधील व-हांडा,मोकळी जागा,इमारत नसलेली मोकळी जागा. |
| २ | दैनंदिन कामाचे स्वरुप व व्याप्ती | दररोज रुग्णालय आवारातील सर्व इमारतीजवळील जागेतील कचरा उचलणे व त्याची विहित पध्दतीने विल्हेवाट लावणे,गटारे ,रस्ते ,पेव्हर ब्लॉक,मोकळी जागा यावर केरसुणी वापरुन कचरा,धुळ काढणे,स्वच्छता करणे.<br>वेळः- सकाळी ७.३० ते सकाळी ११.३०<br>दुपारी ३.३० ते सायं.७.३० |
| ३ | आठवडयातील १ दिवस कामकाजाचे स्वरुप व व्याप्ती | दर सोमवार रुग्णालय आवारातील पूर्व,पश्चिम,उत्तर व दक्षिण चारही दिशाकडील रुग्णालय आवारातील सर्व खुरटी झाडेझुडपे,रानगवत,पडलेली झाडे उचलणे व त्याची विहित पध्दतीने विल्हेवाट लावणे |
| ४ | आवश्यक मनुष्यबळ व साहित्य | ४ कामगार -२ पुरुष व २ महिला<br>कंत्राटदाराने खालील स्वतःचे साहित्य कामगारांना पुरविण्याचे आहे.<br>१) नारळाच्या हिराची केरसुणी<br>७) फावडे<br>८) घमेली<br>९) कुदळ,कोयता,खुरपे<br>१०) लांब दांडीच्या केरसुणी<br>११) कामगारांना हातमोजे ,बुट,टोपी संरक्षक गणवेष<br>१२) काळे पांढरे फिनेल |
| ५ | रुग्णालयाकडून देणेत येणारे साहित्य व वस्तू | **निरंक.** |

**कामाच्या अटी व शर्ती**

१) दैनंदिन स्वच्छता ही दररोज दिलेल्या वेळेत करावी लागेल

२) मोकळे क्षेत्र व कामाचे गरजेनुसार कंत्राटदाराने कामगाार ठेवणेचे आहेत

३) दैनंदिन बाहय क्षेत्राच्या स्वच्छता सेवेचे संनियंत्रण नियुक्त समितीकडून होईल.सदर समिती आपला दैनंदिन अहवाल नोंदवहितील व महिन्याच्या शेवटचे तारखेस कार्यालयास सादर करतील.

४) स्वच्छता सेवा असमाधानकारक असल्यास एकूण देयकातील ०.५ टक्के एवढी रक्कम दंडनिय म्हणून वसुल केली जाईल.

५) संस्थेने/कंत्राटदाराने कामाचे देयक दर महिन्याचे शेवटचे तारखेस मूळ प्रतीत सादर करावे.महिन्याचे सर्व दिवस स्वच्छता कामाचे दिवस असतील.

६) काम सुरु करणेपूर्वी स्वच्छता करावयाच्या परिसराचे/जागेचे रंगीत फोटो कार्यालय/मुख्य अधिपरिचारीका यांच्याकडून माहिती घेऊन व त्यांचे उपस्थितीत काढावेत. सदर फोटोची प्रत या कार्यालयास सादर करावी.

७) स्वच्छता सेवा करतांना कचरा,गवत,पाने यांना आग लावतांना ती जागा विजतंत्री यांना दाखवावी, जेणेकरुन विद्युत वाहिनीचे नुकसान होणार नाही असे घडलेस त्याची वसुली कंत्राटदाराकडून केली जाईल.

८) नियुक्त केलेल्या कामगारांना त्यांचे रोजंदारी/श्रमिक वेतन देणेची जबाबदारी कंत्राटदाराची आहे. या बाबत कोणताही कामगार खालील सही करणार यांचेकडे तक्रार,गा-हाणे घेऊन येणार नाही याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

९) दरपत्रकातील दर स्विकृती - प्राप्त दरपत्रकामध्ये पात्र संस्था/कंत्राटदार यांचे निम्नतम दर.

१०) कार्य आदेश - दरपत्रक स्विकृतीनंतर ७ दिवसांचे आत करारपत्र पूर्ण करुन द्यावे.

११) करारपत्र - रु.१००/- न्यायिक बंधपत्रावर कार्य आदेश दिलेनंतर तयार करुन देणे.

१२) कामाचे देयकाची अदायगी अनुदान उपलब्धतेनुसार अदा करण्यात येईल नोंद असावी.

१३) देयकातील वजावट - शासकिय नियमानुसार जीएसटी,टीडीएस देयकातून वाजाती करणेत येईल.

१४) सफाईगार कर्मचारी यांची दैनंदिन हजेरी संबंधित अधिपरिचारीका घेतील.

१५) कामाचा कालावधी - ४ महिने किंवा राज्यस्तरीय/जिल्हासतरीय निविदा निश्चित होऊन कंत्राटदार नियुक्त होईपर्यंत या पैकी जे अगोदर घडेल तो पर्यंत.

१६) दरपत्रकाचे सर्व अधिकार - जिल्हा शल्य चिकित्सक,सिंधुदुर्ग/वैद्यकिय अधिक्षक,ग्रामीण रुग्णालय,कुडाळ.

(डॉ.संजय अशोक वाळके)
वैद्यकिय अधिक्षक ग्रामिण रुग्णालय,कुडाळ.

वैद्यकीय अधिक्षक वर्ग-१
ग्रामिण रुग्णालय, कुडाळ,
जिल्हा-सिंधुदुर्ग.

ग्रामिण रुग्णालय, कुडाळ • जि. सिंधुदुर्ग.

**व्यवसायाचे लेटरपॅडवर खालील नमुन्यात तयार करावें**

# स्वघोषणापत्र

(१)मी/आम्ही असे जाहिर करतो कि,या दरपत्रकामध्ये किमान मुल्यापेक्षा अधिक दर नमुद केलेले नाहीत अथवा बाजारभावापेक्षा अधिक दर नमुद केलेले नाहीत. या दरपत्रकात नमुद करणेत आलेली उत्पादक कंपनी किंवा माझा व्यवयाय काळयायादीतील नाही.मी किंवा माझे व्यवसायातील नोकर वर्ग यांचा वैद्यकीय अधिक्षक ग्रामीण रुग्णालय कुडाळ किंवा त्यांचे अधिपत्याखालील संस्था या मध्ये कोणतेही नाते वा हितसंबध नाहीत.

(२)मी/आम्ही असे जाहिर करतो कि,माझे/आमचे व्यवसायाचे जीएसटी - वस्तु व सेवा कर याची नोंदणी झालेली असुन वार्षिक आर्थिक उलाढाल रु.२०.०० लक्ष पेक्षा अधिक असलेने जीएसटी - वस्तु व सेवा कर परतावा नियमित भरणेत येतो.

(३)मी/आम्ही असे जाहिर करतो कि,माझे/आमचे व्यवसायाचे वार्षिक आर्थिक उलाढाल रु.२०.०० लक्ष पेक्षा कमी असलेने जीएसटी - वस्तु व सेवा कर या बाबतची नोंदणी केलेली नाही.

(२) व (३) पैकी जे आवश्यक आहे हे ठेवुन इतर खोडावे.

स्थळ -

दिनांक -

नांव,सही,रबरी शिक्का

दरपत्रक व्यवसायाचे लेटरपॅडवर संगणकावर तयार करावे

दिनांक / /२०२६

प्रति,
मा.वैद्यकिय अधिक्षक,
ग्रामीण रुग्णालय,कुडाळ
ता.कुडाळ जि.सिंधुदुर्ग पिन कोड ४१६५२०

विषय - स्वच्छता सेवेचे दरपत्रक सादर करणे बाबत

संदर्भ - दि. / /२०२६ रोजी सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांचे संकेत स्थळावर प्रसिध्द केलेली दरपत्रक सूचना क्र व दि.

महोदय,

संदर्भिय विषयानुसार मी/आम्ही खालील सेवेसाठी वाजवी दर देत आहोत.

| अ.क्र | सेवेचा तपशिल | दर प्रती महिना (सर्व करांसहीत) | संस्थेचे नांव |
|---|---|---|---|
| | | | |

सर्व कागदपत्राचे झेरॉक्स प्रतीवर स्वतः सही करुन साक्षांकित करावेत.

**सोबत** - १) पॅन कार्ड झेरॉक्स
२) जीएसटी नोंदणी असलेस प्रमाणपत्र
३) संस्था नोंदणी असलेस नोंदणी प्रमाणपत्र
४) बचतगट असलेस गटविकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र/दाखला
५) बॅंक पासबुक पहिल्या पृष्ठाची खाते क्रमांक स्पष्ट दिसेल अशी झेरॉक्स प्रत
५) ईतरांचे बाबत स्थानिक स्वराज्य संस्थेचा व्यवसाय चालु असलेचा दाखला

आपला/आपली विश्वासू

(नाव,सही व शिक्का)